**नियमित फौजदारी खटला क्र. ५०/२०१७**
**निशाण क्रमांक ४९ लगत**

**<u>उलटतपास शपथेवर, आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एम. एम. जाधव यांचेकडून</u> –**

**१४.** मी ३६ वर्षे पोलीस सेवेत कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी हे कळंबस्ते, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील राहणार आहेत. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, विनायक सुरेश शिरगांवकर यांच्या चप्पल दुकानात सदरची तथाकथीत बोलणी झाली होती. ते दुकान संगमेश्वर येथे आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने स्वतःहुन येवुन संगमेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०६/१०/२०१६ रोजी फिर्यादीने रत्नागिरी शहर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, तसा तक्रारी अर्ज फिर्यादीने संगमेश्वर पोलीस ठाण्यात दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०६/१०/२०१६ रोजीचा तक्रारी अर्ज रत्नागिरी शहर पोलीस ठाण्याकडुन संगमेश्वर पोलीस ठाण्याकडे चौकशीकरीता वर्ग करण्यात आला होता.

**१५.** हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्रमांक २७ कडील नोंदविलेल्या जबाबात फिर्यादीने आरोपीला एकुण रक्कम रुपये १५,६७,२००/– नोकरीस लावुन देतो असे आरोपी म्हणाल्याने त्याला दिलेबाबतची एकुण रकमेची तारीख, वेळ व कधी दिली हे त्यात नमुद केले नाही, अगर मी देखील त्यांना देखील विचारले नाही. मी निशाणी क्रमांक २७ कडील जबाब वाचुन सांगतो की, त्यामध्ये फिर्यादीने आरोपीला एकुण रक्कम रुपये १५,६७,२००/– ही संपुर्ण रक्कम कोणत्या मार्गाने, कधी व कोठे दिली, याचा उल्लेख करण्यात आला नाही. आरोपीने फिर्यादीकडुन रक्कम रुपये १५,६७,२००/– स्वीकारलेबाबतचा कागदोपत्री पुरावा मी फिर्यादीकडुन जप्त केला नाही.

**१६.** मी जिल्हा मध्यवर्ती बँक येथे जावुन फिर्यादी पिग्मी गोळा करीत असलेबाबत चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे असे म्हणणे होते की, आरोपीसोबत त्याची भेट विनायक शिरगांवकर व सुरेश शिरगांवकर यांनी करुन दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणात त्यांना सह आरोपी केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे चप्पलचे दुकान संगमेश्वर येथे असलेबाबत व ते विनायक शिरगांवकर यांच्या मालकीचे असलेबाबत मी कागदोपत्री पुरावा तपासादरम्यान हस्तगत केलेला नाही.

**१७.** हे म्हणणे खरे आहे की, मी शाखा प्रबंधक, बँक ऑफ इंडिया, शाखा–संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांना निशाणी क्रमांक ५१ कडील दिलेल्या पत्रावर बँकेने *''दिनांक २६/१०/२०१६ रोजी पत्र देवुन दिनांक ०८/१२/२०१४, २०/१२/२०१४, २४/०१/२०१५ रोजी रक्कम खाते क्रमांक १४८४१०११०००४१४२ मध्ये भरणाच झालेली नसल्याने चलने उपलब्ध नाहीत आणि दिनांक ०७/१२/२०१४ रोजी रविवार असल्याने बँकेला साप्ताहिक सुट्टी होती''*, असे कळविले होते. त्या अनुषंगाने मी आणखी कोणती चौकशी केली नाही.

**१८.** हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक ५४ कडील फिर्यादीच्या बँक ऑफ इंडिया, कसबा, ता. संगमेश्वर येथील असलेल्या खात्याच्या खाते उताऱ्यावरुन त्याने आरोपीला रक्कम रुपये १५,६७,२००/– इतकी रक्कम दिल्याचे दिसुन येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक ५४ कडील खाते उताऱ्यासोबत बँकेकडुन भा.पु.का.कलम ६५–ब अन्वयेचे प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक ५६ कडील आरोपीच्या खाते उताऱ्यावरुन आरोपीच्या खात्यात फिर्यादीच्या खात्यातुन रक्कम रुपये १५,६७,२००/– इतकी रक्कम जमा झाल्याचे दिसुन येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक ५६ कडील खाते उताऱ्यासोबत बँकेकडुन भा.पु.का.कलम ६५–ब अन्वयेचे प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

१९. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक ६१ कडील KYC Form यावर आरोपी किंवा संबंधीत बँक अधिकारी यांची स्वाक्षरी नाही व आरोपीचे नाव देखील नाही. त्या अनुषंगाने मी बँकेकडे कोणतीही चौकशी केली नाही. फिर्यादीने सांगितल्यानुसार, दाखल असलेल्या दिवाणी दाव्यातील प्रलंबित स्थितीबाबत मी कोणतीही चौकशी केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासाच्या परीच्छेद क्रमांक ०६ मध्ये ''*आरोपीने एकुण रक्कम रुपये १५,६७२००/- पैकी एकुण रक्कम रुपये १,००,०००/- दिनांक ०५/१०/२०१५, ०७/१०/२०१५, १५/१०/२०१५ व २१/१०/२०१५ रोजी प्रत्येकी रक्कम रुपये २५,०००/- प्रमाणे फिर्यादीच्या बँक ऑफ इंडिया, शाखा-कसबा, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी येथे चलनाद्वारे भरणा करण्यात आली होती*'', हा मजकुर मी फिर्यादीच्या सांगण्यानुसार सरतपासात कथन केला आहे.

२०. हे म्हणणे खरे नाही की, सदर रुपये १,००,०००/- ही रक्कम इतर कोणताही व्यवहार जसा की, आंबा बाग, हात उसने घेतलेले पैसे या अनुषंगाने परत दिलेली असु शकते. हे म्हणणे खरे आहे की, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती बँक, शाखा-फणसवणे, यांचेकडुन निशाणी क्रमांक ६६ सोबत दिलेल्या कागदपत्रांसोबत सोने तारण कर्जाची रक्कम रुपये १,२०,०००/- दिल्याचे दिसुन येते. हे म्हणणे खरे आहे की, सदरची रक्कम फिर्यादीने सोने तारण ठेवुन स्वतः स्वीकारलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सदर सोमा रत्ना कानसे यांनी सोने तारण ठेवुन येणारी रक्कम आरोपीला द्यायची होती, असा उल्लेख सोने तारण कर्ज मिळण्याकरीता अर्जामध्ये करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सोमा रत्ना कानसे यांनी आर्थीक अडचणीस्तव सदरचे सोने तारण कर्ज मिळण्यासाठी अर्ज दिल्याचे दिसुन येते.

२१. हे म्हणणे खरे आहे की, दिपक कृष्णा झिमण यांनी आरोपीने त्यांच्याकडून नोकरी लावुन देतो, असे सांगुन पैसे स्वीकारल्याबाबत आमच्या पोलीस ठाण्यात तक्रार दिली नाही. निशाणी क्रमांक ६८ कडील मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी

यांना मी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने मी आणखी पुढे कोणतीही चौकशी केली नाही. निशाणी क्रमांक ६८ च्या पत्रानुसार मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडुन कोणतेही पत्र मला अगर माझ्या कार्यालयास प्राप्त झालेले नाही. मी त्याबाबत कोणताही पत्र व्यवहार पुढे केला नाही. मा. मुद्रांक जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना आरोपीने सदरची रक्कम स्वीकारुन जमीनीमध्ये गुंतवणुक केली आहे, असे विचारणारे पत्र मी अभिलेखावर दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसे कोणताही पत्र मी मा. मुद्रांक जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना दिलेले नाही.

**२२**. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे १० वी व १२ वी चे गुणपत्रक व प्रमाणपत्र मी आरोपीच्या ताब्यातुन जप्त केलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, एकंदरीत तपासामध्ये, मी फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, आरोपीने त्याच्याकडुन नोकरीला लावुन देतो असे सांगुन पैसे स्वीकारुन त्याची आर्थीक फसवणुक केलेबाबत कागदोपत्री पुरावा हस्तगत केला नाही, अगर अभिलेखावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, एकंदरीत माझ्या तपासामध्ये आरोपीने फिर्यादीकडुन नोकरीस लावुन देतो असे अमीष दाखवुन रक्कम रुपये १५,६७,२००/– स्वीकारुन आर्थिक फसवणुक केल्याचे निष्पन्न झाले नाही.

**२३**. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणात आरोपीची घरझडती घेतलेबाबत घरझडती पंचनामा मी अभिलेखावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने फिर्यादीकडुन एकुण रक्कम रुपये १५,६७,२००/– इतकी रक्कम घेतलेबाबतचा कागदोपत्री पुरावा मी फिर्यादीकडुन हस्तगत केला नाही, अगर अभिलेखावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने फिर्यादीकडुन रक्कम रुपये १५,६७,२००/– इतकी रक्कम ''नोकरीला लावुन देतो'' असे सांगुन स्वीकारलेबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा मी हस्तगत केला नाही, अगर अभिलेखावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने गुन्हयाचे कोणतेही कृत्य केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने फिर्यादीकडुन रक्कम

रुपये १५,६७,२००/– इतकी रक्कम स्वीकारलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर मी खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**.

**फेरतपास नाही**.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.02.05 18:26:01 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि. ०५.०२.२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file evidence are same words as per original Judgment/order/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 05/02/2026 |
| evidence signed by PO. on | :- | 05/02/2026 |
| evidence uploaded on | :- | 05/02/2026 |